एपी टॅक्स कन्सल्टन्सी अँड इन्शुरन्स सर्विसेसचे युवा सेना जिल्हाप्रमुख कृषी जाधव यांच्या हस्ते उद्घाटन >>पान 2

पहिली पासून मुलांवर हिंदीची सक्ती योग्य नाही >>पान 3

जिल्हा परिषद व पंचायत समिती प्रभाग रचनेचा प्रारुप मसुदा प्रसिद्ध >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ



म्हणून आम्ही घटस्फोट घेतला; सायना नेहवालच्या खुलाशाने खळबळ! आतील पान

**सुविचार**
नेहमी शिकण्याची तयारी ठेवा.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 304 ■ शुक्रवार, दि. 18 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# पडळकर, आव्हाडांच्या समर्थकांमध्ये तुफान राडा

## विधानभवनाच्या लॉबीमध्ये हाणामारी

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी : मोठी बातमी समोर येत आहे, काल भाजप आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांच्यामध्ये जोरदार राडा झाला होता. दोन्ही नेत्यांनी एकमेकांना शिवीगाळ देखील केली होती. हे प्रकरण ताजं असतानाच आता पडळकर आणि आव्हाड समर्थकांमध्ये जोरदार राडा झाला आहे. विधानभवनाच्या लॉबीमध्येच दोन्ही नेत्यांचे समर्थक भिडले, यावेळी हाणामारी देखील झाल्याचं पाहायला मिळालं.**

दरम्यान यावेळी बोलताना जितेंद्र आव्हाड यांनी गंभीर आरोप केला आहे, मला मारण्यासाठी विधानभवनात गुंड आले होते, मात्र मला न मारता माझ्या कार्यकर्त्यांवर हल्ला झाला आहे, विधानभवनात काय सुरू आहे? असा सवाल यावेळी आव्हाड यांनी केला आहे.

विधानभवनाच्या लॉबीमध्ये जोरदार राडा झाल्याचं पाहायला मिळालं, जितेंद्र आव्हाड आणि गोपिचंद पडळकर यांचे कार्यकर्ते आपसात भिडले. लॉबीमध्येच हाणामारी देखील झाली. त्यामुळे चांगलाच गोंधळ निर्माण झाल्याचं पाहायला मिळालं.

दरम्यान बुधवारी काल जितेंद्र आव्हाड आणि गोपिचंद पडळकर यांच्यामध्ये जोरदार राडा झाला होता. विधानभवनाच्या दारातच दोन्ही नेते भिडले होते. दोन्ही नेत्यांकडून एकमेकांना शिवीगाळ देखील करण्यात आली. गोपीचंद पडळकरांच्या गाडीचा दरवाजा लागल्याचा आरोप जितेंद्र आव्हाड यांनी केला. त्यानंतर दोन्ही नेत्यांमध्ये जोरदार वाद सुरू झाला. दोन्ही नेत्यांनी एकमेकांना शिवीगाळ केल्याचं पाहायला मिळालं.

त्यानंतर आज आता दोन्ही नेत्यांचे समर्थक भिडले आहेत, विधानभवनाच्या लॉबीमध्येच जोरदार राडा झाला, एकमेकांना मारहाण देखील करण्यात आली. त्यामुळे चांगलाच गोंधळ उडाला. दरम्यान मला मारण्यासाठी विधानभवनात गुंड आले होते, मात्र मला न मारता माझ्या कार्यकर्त्यांवर हल्ला झाला असा गंभीर आरोप या प्रकरणावर बोलताना आव्हाड यांनी केला आहे. काल आव्हाड आणि पडळकर यांच्यामध्ये जोरदार राडा झाला, दोघांनीही एकमेकांना शिवीगाळ केली, त्यानंतर आज कार्यकर्ते भिडले त्यामुळे आता हे प्रकरण आणखी तापण्याची शक्यता आहे.

आव्हाड-पडळकर समर्थकांचा राडा

## मुख्यमंत्री फडणवीस संतापले, कडक कारवाईचा इशारा

**मुंबई/प्रतिनिधी :** ही विधानपरिषद आहे याठिकणी दररोज हजारो अभ्यागत येत असतात. व या ठिकाणी मोठ्या प्रमाणात लोक जमा होतात आणि मारामारी करतात अशा ठिकाणी असे वर्तन अयोग्य आहे. हा सर्व परिसर विधानपिरषद सभापतींच्या अधिकारात आहे. त्यामुळे मी विधानसभा सभापतींना या हाणामारी करणाऱ्या सर्व लोकांवर कडक कारवाई करावी अशी विनंती केली आहे. व यासदर्भात मी सभापतींशी बोललो आहे अशी प्रतिक्रीया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आव्हाड - पडळकर यांच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या मारामारी प्रकरणी दिली आहे.

याठिकाणी मोठ्या प्रमाणात जमा होतात व मारामारी करतात हे लोकशाहीच्या मंदिरात शोभणारे नाही. हे कदापीही सहन करण्याजोगे नाही, योग्य नाही कडक कारवाई करावी असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढे म्हटले आहे.

याप्रकरणी सवस्तिर वृत्त असे की आज विधानपरिषदेच्या आवारात भाजपा आमदार गोपिचंद पडळकर व राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांचे कार्यकर्ते समोरा समोर आले त्यांनी एकमेकांची गळपट्टी धरुन चांगलीच हाणामारी केली. या प्रकरणाचे पडसाद सर्व राज्यात पडले असून राजकीय वातावरण तंग झाले आहे. या पार्श्र्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यानी माध्यमांशी बोलताना वरील प्रतिक्रीया दिली आहे.

दरम्यान आज भाजप आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यातील जुना वादाचे पडसाद. विधान भवनातील लॉबीमध्ये उमटले. पडळकर- आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांमध्ये अक्षरश: मारामारी झाली. शिवीगाळ आणि मारहाणीची ही घटना कॅमेऱ्यातही कैद झाली असून लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरात



अशा प्रकारची घटना घडल्याने सर्वच स्तरातून नाराजी व्यक्त होत आहे.

गुरुवारी संध्याकाळी जितेंद्र आव्हाड आणि गोपीचंद पडळकर यांचे कार्यकर्ते विधान भवनाच्या लॉबीमध्ये आमनेसामने आले. आक्रमक कार्यकर्त्यांमध्ये पुन्हा वाद झाला आणि वादाचे रुपांतर हाणामारीत झाले. लॉबीत उपस्थित असलेल्या पोलिसांनी आणि इतर कार्यकर्त्यांनी हा वाद सोडवला. वाद नेमका कसा सुरू झाला, नेमकं काय घडलं हे अद्याप समजू शकलेले नाही.

## शाई फेक प्रकरणातील आरोपी दीपक काटे सह एकाला जामीन मंजूर

**सोलापूर/प्रतिनिधी :** संभाजी ब्रिगेडचे ज्येष्ठ नेते प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या शाही फेक प्रकरणातील आरोपी दीपक काटे व भवानेश्वर शिरगिरेला अक्कलकोट न्यायालयाने २० हजाराच्या जात - मचुलक्यावर तसेच वेगवेगळ्या अटी व शर्तीवर जमीन मंजूर केला आहे.

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे एका कार्यक्रमाला जात असताना आरोपी दिपक काटे आणि भुवनेश्वर शिरगिरे यांनी त्यांच्या अंगावर शाही व्यक्त करून हल्ला केला होता. या प्रकरणात पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन आज अक्कलकोट न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दोघांना अटी व शर्तीवर जामीन मंजूर केला आहे. तसेच पुढे तपासासाठी सहकार्य करण्याच्या अटी व शर्ती घालून दिली आहे. अक्कलकोट तालुका प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी एम एम कल्याणकर यांनी दिला. सदर प्रकरणे आठ दिवसाला अक्कलकोट किंवा सोलापूर या ठिकाणी पोलीस स्टेशनला दीपक काटे आणि भुवनेश्वर शिरगिरेला हजेरी लावली लागणार आहे. अशी माहिती आरोपी दीपक काटेचे वकील हेमंत कुमार शाका यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## पारपत्र अर्जामध्ये दिलेल्या पत्त्याची चोख पडताळणी करणार : गृह राज्यमंत्री योगेश कदम

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** पारपत्र अर्जासंदर्भातील पोलीस पडताळणी अत्यंत अचूक आणि नियमबद्ध असणे आवश्यक आहे. पारपत्रासाठी अर्ज करताना अर्जदाराला कायमस्वरूपी आणि सध्याचा पत्ता देण्याचे पर्याय असतात. अर्जदाराने अर्जात दिलेल्या सध्याच्या पत्त्याची असलेली पडताळणी चोखपणे करण्यात येईल. याबाबत केंद्र शासनाचे विशिष्ट कार्यप्रणालीनुसार सध्याच्या पत्त्याची पडताळणी करण्याच्या सूचना पोलीस विभागाला देण्यात येतील, असे गृहराज्यमंत्री (शहरे) योगेश कदम यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले.

इमारतीचा पुनर्विकास सुरू असताना घर बदलावे लागत असल्यामुळे सध्याच्या पत्त्यावर पारपत्रासाठी पोलिस पडताळणी करण्याबाबत विधानसभा सदस्य मनीषा चौधरी यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. या सूचनेच्या चर्चेत सदस्य सर्वश्री अमित साटम, सुनील प्रभू यांनीही उपप्रश्न विचारत सहभाग घेतला. राज्यमंत्री श्री. कदम म्हणाले, अर्जदार व्यक्ती प्रत्यक्षात तीच आहे का, तिच्यावर कोणते गुन्हे प्रलंबित आहेत का किंवा तिच्याविरुद्ध कोणतेही समन्स,वॉरंट आहे का, याची शहानिशा करणे गरजेची असते. ही प्रक्रिया देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही



महत्त्वाची आहे.

पारपत्र पोलीस पडताळणी करताना दिलेल्या पत्त्यावर पोलीसांनी प्रत्यक्ष जाऊन खात्री करणे अनिवार्य आहे. विशेषत: पुनर्विकास प्रक्रियेत असलेल्या इमारतींसंदर्भात, विकासकांकडून नागरिकांना तात्पुरत्या वास्तव्याची सोय किंवा भाडे दिले जाते. अशा वेळी त्या भाडेकरारातील तात्पुरता पत्ता अधिकृतरित्या पडताळणीसाठी ग्राह्य धरला जातो. तसेच या प्रक्रियेसंदर्भात केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करण्यात येते.

पारपत्र पडताळणी प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्याचा कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग आणि पासपोर्ट डिजिटल ॲप सारख्या नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून यामध्ये अधिक सुलभता आणि पारदर्शकता आणण्यात येईल. परपत्रासाठी अर्ज करताना सध्याचा पत्त्याची पडताळणी करण्यात येत असल्याबाबत जनजागृती करण्यात येईल, असेही राज्यमंत्री श्री. कदम यांनी सांगितले.

## विधिमंडळात मंडळामध्ये झालेला प्रकार अतिशय निंदनीय : खा. सुनील तटकरे

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** विधिमंडळात झालेला प्रकार अतिशय निंदनीय आहे. अशी प्रतिक्रिया खासदार सुनिल तटकरे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की,विधिमंडळाच्या स्थापनेपासून विधिमंडळात किंवा त्याच्या बाहेर असा हाणामारी होण्याचा प्रकार कधी घडला नाही.मात्र आज जो प्रकार विधीमंडळात घडला तो अतिशय



अतिशय दुर्दैवी आहे. त्यामुळे या घटनेचा मी निषेध करतो. विधिमंडळात प्रवेश देताना अशा गोष्टींची खबरदारी घ्यायला हवी. यात जे कोणी दोष असेल त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई व्हायला हवी, अशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मागणी आहे. झालेली घटना निंदनीय असून विधानसभा अध्यक्ष आणि विधान परिषद सभापतींनी पोलिसांना कारवाईचे आदेश द्यावी. अशी प्रतिक्रिया खासदार सुनिल तटकरे यांनी छत्रपती संभाजीनगर येथे माध्यमांशी बोलताना दिली.

## पुणे विमानतळावर चॉकलेट बॉक्स उघडताच निघाले साप, प्रवाशाचा प्रताप, पोलिसांकडून मोठं रॅकेट उघडकीस

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. इथं पोलिसांना दोन विदेश नागरिकांवर संशय आल्यानंतर पोलिसांनी आरोपींच्या बॅगांची झडती घेतली. यावेळी त्यांच्या बॅगमध्ये पोलिसांना नको तेच सापडलं आहे. संबंधित प्रकार पाहून पोलीस हादरून गेले. बॅग तपासले असता बॅगेत ठेवलेल्या चॉकलेट बॉक्समध्ये चक्क दुमिर्ळ साप, ससे आणि पोपट आढळले आहेत.चॉकलेटच्या बॉक्समधून केल्या जाणाऱ्या तस्करीचा हा प्रकार पाहून पोलीसही हादरले. चॉकलेट बॉक्समधून एकूण १४ सापांची तस्करी केली जात होती. बेकायदेशीरपणे वन्यजीव प्राणी आणि पक्षांची तस्करी केल्याप्रकरणी पुणे कस्टम विभागाकडून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. पोलीस घटनेचा पुढील तपास करत आहेत.

आंतरराष्ट्रीय वन्यजीव कायद्यानुसार संरक्षण असलेले १४ साप (ग्रीन ट्री पायथन), चार पोपट (ग्रीन आय पॅरेट) आणि सुमात्रात आढळणारे दोन दुर्मीळ ससे आरोपींकडून ताब्यात घेण्यात आले. तस्करी दरम्यान एका सापाचा मृत्यू झाला. वन्यजीवांच्या खरेदी-विक्रीवर आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्बंध असल्याने त्यांची बेकायदा वाहतूक हा गुन्हा आहे. तरीही बँकॉकमधून दोन प्रवासी मंगळवारी रात्री दोन वाजता परदेशी वन्यजीव पुण्यात घेऊन आले. सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना शंका आल्याने बॅगेची तपासणी करण्यात आली.

## काँग्रेस हाय कमांडची कुठलीही नोटीस आलेली नाही : विजय वडेट्टीवार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** काँग्रेस हाय कमांडची कुठलीही नोटीस आम्हाला आलेली नाही.अशी माहिती आमदार विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, चंद्रपूर जिल्हा बँकेची निवडणूक होती.त्यामुळे विधेयकाला तेव्हा उपस्थित नव्हतो. खरं तर त्या दिवशी वॉक आउट करणे गरजेचे होते. तोंड दाबण्याचे काम सरकार करते आहे.१२ हजार आक्षेप या बिलासंदर्भात आले होते.प्रदेशाध्यक्षांकडे कोण काय सभागृहात बोलले याचा अहवाल मी देणार आहे. हाय कमांडकडून कुठलीही नोटीस आली नाही.अशी माहिती आमदार विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



## काँग्रेस हायकमांडकडून विजय वडेट्टीवार, सतेज पाटलांना नोटीस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभेत काही दिवसांपूर्वी जनसुरक्षा विधेयक मंजूर करण्यात आले. मात्र या विधेयकावरून मोठा गदारोळ झाल्याचे दिसून आले होते. आता काँग्रेसमध्ये यावरून कारवाईला सुरुवात करण्यात आली आहे. हे विधेयक मांडताना ज्या प्रकारे काँग्रेसने विरोध करणे अपेक्षित होते त्या प्रकारे विरोध करण्यात आला नाही. त्यामुळे काँग्रेस हायकमांकडून काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, सतेज पाटील आणि अमीन पटेल यांच्याकडे अहवाल मागवल्याची माहिती समोर येत आहे. जन सुरक्षा विधेयकाला विरोध का केला नाही? याचा अहवाल सादर करावा, अशी नोटीस पाठवण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. दरम्यान याबाबत बोलताना विजय वडेट्टीवार आणि सतेज पाटील यांनी आम्हाला कुठलीही नोटीस आलेली नाही, असे म्हटले आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, हायकमांडची कुठलीही नोटीस मला आलेली नाही. बँकेची निवडणूक होती त्यामुळे विधेयकाला मी उपस्थित नव्हतो. सभागृहात काँग्रेसचे नेते होते त्यांनी योग्य बाजू मांडली. त्यांनी केलेले भाषण आम्ही हाय कमांड कडे पाठवणार आहोत. प्रदेशाध्यक्षांना सुद्धा देणार आहोत. खरे तर त्या दिवशी वॉक आउट करणं गरजेचं होतं. तोंड दाबण्याचे काम सरकार करत आहे. प्रदेशाध्यक्षांनी एक नोट मला दिली होती. बाकी आमदारांकडे सुद्धा ती नोट होती. पण, सभागृहामध्ये हे बिल आले तेव्हा सरकारने सांगितले की, समितीमध्ये चर्चा झाली आहे. तिथे फार चर्चा करता येणार नाही.

**आम्ही स्ट्रॉन्गली विरोध करायला हवा होता : विजय वडेट्टीवार**

१२ हजार आक्षेप या बिलासंदर्भात आले होते. आमदारांनी सुद्धा काही सूचना यामध्ये केल्या होत्या. प्रदेशाध्यक्षांकडे कोण काय सभागृहात बोलले? याचा अहवाल मी देणार आहे. हाय कमांडकडून कुठलीही नोटीस आली नाही. मी सभागृहात असतो तर मी सभागृहातच बिल फाडून टाकलं असतं. प्रदेशाध्यक्षांनी सांगितलं होतं की, या बिलाला विरोध कसा करायचा आणि अशा प्रकारची नोट दिली होती. आम्ही स्ट्रॉन्गली विरोध करायला हवा होता. कारण तो मेसेज तसा या विधेयकाच्या विरोधात गेला असता. पण ते झालं नाही. महाविकास आघाडीमध्ये समन्वय साधणे यावेळी गरजेचं होतं. मात्र त्यावेळी ते झालं नाही हे खरं आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

**जनसुरक्षा विधेयक अचानक सभागृहात आलं : सतेज पाटील**

तर सतेज पाटील म्हणाले की, जन सुरक्षा



विधेयकाच्या वेळी आम्ही सभागृहात होतो. विजय वड्डेटीवार यांच्याशी माझं बोलणं होईल. आता माझं त्यांच्याशी बोलणं झालं नाही. जनसुरक्षा विधेयक अचानक सभागृहात आलं. त्यामुळे ते उपस्थित नसतील. जनसुरक्षा विधेयकाबाबत आम्ही नेमकी काय बाजू मांडली? हे आम्ही पक्षश्रेष्ठींना कळवू. समितीमध्ये सुद्धा सूचना दिल्या होत्या. आम्ही जी काय माहिती आहे ती पक्षाला कळवू, असे त्यांनी म्हटले.

## सुपरस्टार राजेश खन्ना

हिंदी चित्रपट सृष्टीतील पहिले सुपरस्टार म्हणून ओळखले जाणारे जेष्ठ अभिनेते राजेश खन्ना यांची आज तेरावी पुण्यतिथी. राजेश खन्ना यांचा जन्म २९ डिसेंबर १९४२ रोजी पंजाबमधील अमृतसर येथे झाला. राजेश खन्ना यांचे मूळ नाव जतीन खन्ना असे होते. त्यांच्या आईचे नाव चंद्राणी खन्ना तर वडिलांचे नाव लाला हिराणी असे होते. त्यांचे वडील शाळेत मुख्याध्यापक होते. त्यांच्या एका जवळच्या नातेवाईकांना मुलबाळ नव्हते म्हणून त्यांच्या आई वडिलांनी त्यांना त्या नातेवाईकांकडे दत्तक दिले. त्यांच्या नवीन आईचे नाव लीलावती खन्ना तर वडिलांचे नाव चुनीलाल खन्ना असे होते. चुनीलाल खन्ना रेल्वे कंत्राटदार होते. ते मुंबईत राहत होते. राजेश खन्ना हे सेंट सबिस्टाईन गॉन हायस्कूल येथे शिकत असताना त्यांची रवी कपूर यांच्याशी ओळख झाली. रवी कपूर म्हणजेच हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते जितेंद्र. राजेश खन्ना व जितेंद्र यांनी कॉलेज जीवनात अनेक नाटकात एकत्र काम केले. नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी राजेश खन्ना हे पुण्यात आले. पुण्यात दोन वर्ष शिक्षण घेतल्यावर ते पुन्हा मुंबईला परतले. मुंबईत काही दिग्दर्शकांनी टॅलेंट हंट स्पर्धा आयोजित केली. राजेश खन्ना यांच्या काकांनी त्यांचे नाव या स्पर्धेकरिता नोंदवले. ते नोंदवताना त्यांनी त्यांचे नाव जतीन खन्ना ऐवजी राजेश खन्ना म्हणून नोंदवले पुढे याच नावाने ते ओळखले जाऊ लागले. या स्पर्धेत त्यांनी पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले त्यांच्या अभिनयाने त्याकाळातील दिग्गज दिग्दर्शक प्रभावित झाले. १९६६ साली चेतन आनंद यांनी त्यांना आखरी खत या चित्रपटात संधी दिली हाच त्यांचा पहिला चित्रपट. हा चित्रपट ऑस्करला गेला होता. पहिल्याच चित्रपटातील त्यांच्या अभिनयाने चित्रपट रसिक तसेच जाणकार प्रभावित झाले त्यामुळे त्यांना अनेक चित्रपट मिळाले. त्याकाळातील यशस्वी दिग्दर्शक असणारे शक्ती सामंत यांनी त्यांना आराधना या चित्रपटात नायकाची भूमिका दिली. या चित्रपटात शर्मिला टागोर या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट सुपरहिट झाला. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. या चित्रपटा नंतरच राजेश खन्ना सुपरस्टार म्हणून ओळखले जाऊ लागले. राजेश खन्ना यांची अदाकारी, संवाद फेकीची लकब यावर तरुणाई फिदा झाली. विशेषतः कॉलेज मधील मुली त्यांच्यावर जीव ओवाळून टाकू लागल्या. त्यांचे चाहते त्यांच्या गाडीचे चुंबन घ्यायचे. मुली त्यांच्या गाडीची धूळ आपल्या भांगेत भरत. बऱ्याचश्या मुलींनी त्यांच्या फोटोशी लग्न केले होते. त्यांना चाहत्यांचे जितके प्रेम लाभले तितके प्रेम कोणत्याच कलाकाराला लाभले नाही. राजेश खन्ना यांचे सलग १५ चित्रपट सुपरहिट झाले हा एक विक्रम आहे. तो अजूनही कोणत्या अभिनेत्याला तोडता आला नाही. शर्मिला टागोर, मुमताज, अशा पारेख, तनुजा यांच्याशी त्यांची चांगली केमिस्ट्री जमली. सत्तरच्या दशकात राजेश खन्ना सुपरस्टार पदावर आरूढ झाले होते. चालण्या बोलण्याची विशिष्ट ढब, मानेला खास झटका देत, हातवारे करत नाचण्याची अनोखी शैली, जबरदस्त संवाद फेक आणि ओठावर रुंजी घालतील अशी गाणी यामुळे राजेश खन्ना हे अफलातून रसायन बनून गेले. त्याकाळात सर्वाधिक मानधन घेणारे राजेश खन्ना यांची प्रेम प्रकरणेही गाजली पण १९७३ साली त्यांनी आपल्या पेक्षा कितीतरी लहान वयाच्या डिंपल कपाडिया यांच्याशी विवाह केला. १९९२ साली काँग्रेसच्या वतीने त्यांनी दिल्ली मतदार संघातून लोकसभेची पोटनिवडणुक लढवली आणि ते खासदार म्हणून निवडून आले. १८ जुलै २०12 रोजी राजेश खन्ना यांनी चाहत्यांना अलविदा म्हणत जगाचा निरोप घेतला आणि बॉलिवूडचा पहिला सुपरस्टार काळाच्या पडद्याआड गेला.

बाबूमोशाय....... बाबू मोशाय जिंदगी और मौत उपरवाले के हात है जहाँपणा...जिसे ना तो आप बदल सकते है ना मैं.... हम सब तो रंगमंच की कटपुतलीया है, जीसकी डोर उपरवालेकी उंगलीओमे बंधी है....कब कोण कैसे उठेगा कोई बता नहीं सकता..... आनंद कभी मरते नहीं वह हमेशा याद रहते है.... we all miss you.....

राजेश खन्ना यांना विनम्र अभिवादन!

# एपी टॅक्स कन्सल्टन्सी अँड इन्शुरन्स सर्विसेसचे युवा सेना जिल्हाप्रमुख कृषी जाधव यांच्या हस्ते उद्घाटन

## कार्यक्रमाला विविध मान्यवरांची उपस्थिती

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** एपी टॅक्स कन्सल्टन्सी अँड इन्शुरन्स सर्विसेस चे उद्धाटन बुलढाणा युवासेना जिल्हाप्रमुख ऋषी जाधव यांच्याहस्ते मोठ्या दिमाखात आणि विविध मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.उदघाटन प्रसंगी विनोद जाधव ( बुलढाणा अर्बन डोणगाव ) यांनी ऋषी जाधव यांचा सत्कार केला. तसेच वेगवेगळ्या क्षेत्रातुन आलेल्या मान्यवरांनी उपस्थित राहून शुभेच्छा रुपी आशीर्वाद दिले.

रमेशराव जाधव (से. नि. एम.एस.सी.ई.बी.), विनायकराव धाबे (प्रगतशील कास्तकार नागापूर), तनशीराम माणघाले (जगदंबा ग्रुप मेहकर), गजानन पागोरे (मानराज मोटर्स मेहकर), ब्रम्हचारी बोडखे, सचिन जोशी, संजय निकम, दिपक वाघ, संतोष झोपाटे, राहुल बोरुडे, माधव शिंदे, रविकुमार भोणे, गजानन जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

द्घाटन कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ऋषी जाधव यांनी एपी टॅक्स कन्सल्टन्सी अँड इन्शुरन्स सर्विसेस परिसरातील नागरिकांना एक मोठी सुविधा निर्माण झाली आहे. याचा नागरिकांना नक्कीच फायदा होईल असे मत व्यक्त केले. तसेच संचालक आशुतोष पांडव यांच्या सोबत व्यवसायाविषयी चर्चा रून पुढील वाटचालीस शुभेच्छा रुपी आशीर्वाद दिले.






तसेच आशुतोष यांना आपल्या प्रॅक्टिस व शिक्षणा बद्दल चौकशी केली असता आशुतोष यांनी व्यक्त केले कि,ए पी टॅक्स कन्सल्टन्सी अँड इन्शुरन्स सर्विसेस हे सी.ए आशिष खरात व अड. निलेश खरात यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करत असून इन्शुरन्स, अकाउंटिंग तसेच ऑनलाईन चे सर्व कामे स्वतः करत असल्याचे सांगितले.तसेच यावेळी इतर मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# बदलापूरात अनधिकृत कत्तलखान्यावर पालिकेची तोडक कारवाई





**बदलापूर/प्रतिनिधी :** बदलापूरात आज अनधिकृत सात कत्तलखान्यांवर पालिकेने तोडक कारवाई करत ,ते जमीनदोस्त केले. गेल्या अनेक दिवसांपासून हे कत्तलखालखाने अनधिकृत रित्या सुरू होते. आज याबाबत विधानसभेत लक्षवेधी करण्यात आली होती. त्यानंतर पालिकेने आज ही तोडक कारवाई केली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून यावेळी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. गेल्या अनेक दिवसांपासून बदलापूर गावातील कान्होर रोडवर हे सर्व कत्तलखाने अनधिकृत रित्या सुरू होते. प्रशासक मारुती गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली पालिकेच्या अतिक्रमण पथकाने ही तोडक कारवाई केली आहे.

## म्हणून आम्ही घटस्फोट घेतला; सायना नेहवालच्या खुलाशाने खळबळ!

**मुंबई/प्रतिनिधी :**भारताची स्टार बॅडमिंटनपटू सायना नेहवालने पती आणि बॅडमिंटनपटू पारुपल्ली कश्यप याच्यापासून विभक्त होत असल्याची धक्कादायक घोषणा केली आहे. तिने तिच्या इंस्टाग्राम हँडलवरून ही माहिती शेअर केली. २०१८ मध्ये विवाहबद्ध झालेल्या या जोडीने आता लग्नाच्या ७ वर्षांनंतर वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे. सायना केवळ तिच्या खेळासाठीच नाही, तर तिच्या कोट्यवधींच्या संपत्तीसाठीही ओळखली जाते.

७ वर्षांनंतर वेगळे होण्याचा निर्णय

सायनाने रविवारी आपल्या इंस्टाग्राम स्टोरीमध्ये लिहिले की, ''आयुष्य कधीकधी आपल्याला वेगवेगळ्या दिशांना घेऊन जाते. खूप विचारविनिमय केल्यानंतर, मी आणि पारुपल्लीने एकमेकांपासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही एकमेकांसाठी शांती, प्रगती आणि दिलासा निवडत आहोत. या काळात आमच्या गोपनीयतेचा आदर केल्याबद्दल धन्यवाद.'' सायना आणि कश्यप हैदराबादमधील बॅडमिंटन अकादमीमध्ये सरावाच्या दिवसांपासून एकत्र होते आणि १४ डिसेंबर २०१८ रोजी त्यांनी लग्न केले होते.


पद्मश्री, पद्मभूषण आणि अर्जुन पुरस्काराने सन्मानित सायना नेहवाल देशातील सर्वात श्रीमंत खेळाडूंपैकी एक आहे. रिपोर्ट्सनुसार, तिची एकूण संपत्ती अंदाजे ५ मिलियन डॉलर (सुमारे ४२-४५ कोटी रुपये) आहे. तिचे मासिक उत्पन्न सुमारे ३५-४० लाख रुपये असल्याचे म्हटले जाते. तिच्या कमाईमध्ये खेळातून मिळणाऱ्या बक्षिसांव्यतिरिक्त ब्रँड एंडोर्समेंटचा मोठा वाटा आहे.

सायनाच्या मालकीची हैदराबादमध्ये आलिशान घर-

सायना ( ) अनेक मोठ्या कंपन्यांची ब्रँड ॲम्बेसेडर आहे, ज्यात योनेक्स (), मॅक्स लाईफ ( ), केलॉग्स (') आणि रसना () यांसारख्या कंपन्यांचा समावेश आहे. एका ब्रँड एंडोर्समेंटसाठी ती सुमारे ७५ लाख ते १ कोटी रुपये शुल्क आकारते. सायनाच्या मालकीची हैदराबादमध्ये एक आलिशान घर आहे, ज्याची किंमत ४ कोटी रुपयांपेक्षा जास्त असल्याचे सांगितले जाते. तसेच, तिच्या कार कलेक्शनमध्ये मिनी कूपर, बीएमडब्ल्यू आणि मर्सिडीज बेंझ यांसारख्या लक्झरी गाड्यांचा समावेश आहे.

# भंडारा, परभणी, बीडमध्ये मुसळधार पाऊस, विजांच्या कडकडाटासह मराठवाड्याला पाऊस झोडपणार

दैनिक आपला विदर्भ



**पुणे/प्रतिनिधी :** राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे, तर मराठवाड्यातील काही जिल्ह्यांम ध्ये पावसाअभावी पिकांनी माना टाकल्या आहेत. अनेक हेक्टरवरील पीक सुकले आहे. अशातच बीडमध्ये झालेल्या पावसामुळे पिकांना जीवदान मिळालं आहे. बीड जिल्ह्यात पंधरा दिवस दडी मारल्यानंतर बीड जिल्ह्यात पुन्हा पावसाने हजेरी लावण्याचे पाहायला मिळाले आहेत. रात्री माजलगाव परिसरात पाऊस धो धो बरसत होता. यामुळे काही शेतात पाणी देखील जमल्याचे दिसून आले आहे. याचबरोबर परळी आणि अंबाजोगाई परिसरात देखील रात्रभर पावसाची रिपरिप सुरू राहिल्याने खरिपाच्या पिकाला जीवदान मिळालं आहे. परळी परिसरातील शेतकऱ्यांना गेले दीड महिन्यापासून पावसाची प्रतीक्षा होती. आता या झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे.

परळी तालुक्यातील सिरसाळा येथे काल (बुधवारी, ता-१६) रात्री झालेल्या पावसामुळे रामेवाडी - पोहनेर मार्गावर असलेला पर्यायी फुल वाहून गेल्याने सिरसाळा ते पोहनेर दरम्यान असलेली वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. रात्री पडलेल्या पावसामुळे या सरस्वती व गुनवरा अशा दोन्ही नद्यांना पाणी आले. सरस्वती नदीवरील असलेल्या पुलाचे काम सुरू असल्याने बाजूला पर्यायी पूल उभारण्यात आला होता, मात्र नदीला पाणी आल्याने हा पूल वाहून गेला आहे. पूल वाहून गेल्याने सिरसाळा पोहनेर मार्ग पूर्णपणे बंद झाला आहे. बांधकाम विभागाने दुर्लक्ष केल्याने या पुलाचे काम संथगतीने होत असल्याचे नागरिकांकडून सांगण्यात आले आहे.

परभणी जिल्ह्यात पहाटे जोरदार पाऊस

परभणी जिल्ह्यात पावसाअभावी पिकांची परिस्थिती गंभीर झाली असतानाच वरूण राजाने परभणीकरांची आर्त हाक ऐकली आज पहाटे परभणी शहरासह जिल्ह्यात जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. ज्यामुळे अनेक ठिकाणी ओढ्याला पाणी आले आहे. सेलू शहरातील देवुळगाव गात येथील कसुरा नदीलाही पाणी आले आहे. सर्वत्र जोरदार पाऊस झाल्याने पिकांना मोठा दिलासा मि ळाला आहे. सेलू शहरातील सेलू शहरातील तेली गल्ली, अरब गल्ली, नाला रोड परिसरात नागरिकांच्या घरात पाणीच पाणी झाले असून अन्न धान्य व संसार उपयोगी साहित्यचे या पावसात नुकसान झाले आहे. दुसरीकडे अनेक ठिकाणी शेतात पाणीही साचले आहे.

आज ३ जिल्ह्यांना सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाचा यलो अलर्ट


काल रात्री बीड, परळी,भंडारा याठिकाणी मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे, तर आज १७ जुलै रोजी मराठवाड्यातील नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यात पावसाचा अंदाज आहे. त्याचबरोबर काही भागांमध्ये विजांच्या कडकडासह मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानकडून वर्तवण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये पावसाने विश्रांती घेतली असून तापमानात मोठी वाढ झाली आहे. आज जिल्ह्यात ढगांच्या गडगडाटासह हलक्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

# विविध मागण्या घेऊन सनातन हिंदू धर्म जागरण यात्रा बुलढाण्यात दाखल

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** भारताला हिंदू राष्ट्र घोषित करा, भगवान श्रीकृष्ण जन्मभूमी मथुरा येथील मुघल कालीन अतिक्रमण काढून भव्य मंदिरचे निर्माण करावे, काशी विश्वनाथ ज्ञानवापी संपूर्णपणे हिंदू धर्मियांच्या स्वाधीन करण्यात यावी, गो मातेला राष्ट्रमाता म्हणून घोषित करण्यात





यावी, यासह इतर मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी सनातन हिंदू जागरण यात्रेचे आयोजन करण्यात आले होते, हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ ते बुलढाणा जिल्ह्यातीलं रायरेश्वर महादेव मंदिर चिंचपूर पर्यंत यात्रा काढली जाणार आहे, या यात्रेला ११ जुलै रोजी सुरुवात करण्यात आली होती. तीनशे किलोमीटरचा प्रवास करून आज ही यात्रा बुलढाणा शहरात दाखल झाली असुन उद्या बुलढाण्यातील चिंचपूर येथे समारोप होणार आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

**हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित**

## संक्षिप्त...

### घरातील दागिने आणि रोख रक्कम चोरणाऱ्या नोकराला राजस्थान वरुन अटक, ४२ लाखांचा मुद्देमाल हस्तगत



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** खारघर मधील एका घरात चोरी झाल्याप्रकारणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. घरातील नोकरनेच तिजोरीतील सर्व दागिने आणि रोख रक्कम चोरी करुन पसार झाला होता. याप्रकरणी खारघर पोलिसांनी राजस्थान आणि हिमाचल प्रदेश येथे २ पथक पाठवून आरोपींचा तपास सुरु केला होता. अखेर राजस्थान मध्ये आरोपीला ताब्यात घेत त्याची चौकशी केली असता त्याने गुन्हा कबूल केला. खारघर पोलिसांनी ४२ लाख ६० हजार रुपये किंमतीचे दागिने आणि रोख रक्कम असा १००% मुद्देमाल हस्तगत केला असून, अशा घटना टाळण्यासाठी घरात नोकर ठेवताना पोलीस वेरिफिकेशन करुन घेण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### गोपीचंद पडळकर यांच्या विरोधात मुंब्रा मध्ये आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** गोपीचंद पडळकर यांच्याविरोधात मुंब्रा येथे सय्यद अली अश्रफ, शमीम खान आणि शानू पठाण यांच्या नेतृत्वाखाली जोरदार हल्लाबोल आंदोलन करण्यात आले. पडळकर यांच्या प्रतिमेला जोडे मारून तसेच त्यांचे छायाचित्र पायाखाली तुडवून निषेध करण्यात आला. दरम्यान, पडळकर यांच्यावर पोलीस कारवाई करावी तसेच त्यांनी जाहीर मागावी; अन्यथा, सबंध ठाणे शहरातील चौकाचौकात त्यांचे पुतळे जाळू, असा इशारा कळवा-मुंब्रा विधानसभा क्षेत्राध्यक्ष शमीम खान यांनी दिला.

बुधवारी विधिमंडळाच्या प्रवेशद्वारावर जितेंद्र आव्हाड आणि गोपीचंद पडळकर यांच्यात वाद झाला. जितेंद्र आव्हाड हे गाडीकडे पहात असताना गोपीचंद पडळकर यांनी शिविगाळ केली. या घटनेचा निषेध म्हणून मुंब्रा शहरात राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने हजारो कार्यकर्त्यांनी जोरदार आंदोलन केले. या प्रसंगी कार्यकर्त्यांनी , '' मंगळसूत्र चोराला अटक करा... मंगळसूत्र चोराला बेड्या घाला; अशा घोषणा देऊन पडळकर यांच्या प्रतिमेस जोडे मारले. पडळकर यांच्या प्रतिमा पायाखाली तुडविण्यात आल्या. तसेच, मुंब्रा पोलिसांना निवेदन देऊन पडळकर यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली.

### मालमत्ता करावरील शास्ती मध्ये भरीव सवलत जाहीर; ६०० कोटी पेक्षा अधिकच्या आर्थिक भुर्दंडातून पनवेलकरांची सुटका - आमदार विक्रांत पाटील




दैनिक आपला विदर्भ

**पनवेल/प्रतिनिधी :** पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ता कराबाबत गेल्या काही वर्षापासून शास्ती माफी संदर्भात मोठ्या प्रमाणात मागणी होत होती. त्यानूसार मालमत्ता करांवरील शास्तीमध्ये सवलत 'अभय योजना' महानगरपालिकेने दिनांक १८ जुलै पासून ते २० सप्टेंबर या कालावधीकरीता विविध टप्प्यामध्ये लागू केली आहे. या संदर्भात भाजप आमदार विक्रांत पाटील यांनी म्हटलं की, मालमत्ता करावरील शास्ती मध्ये भरीव सवलत जाहीर झाल्यामुळे ६०० कोटी पेक्षा अधिकच्या आर्थिक भुर्दंडातून पनवेलकरांची सुटका झाली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे वारंवार पाठपुरावा केला. त्यामुळे पनवेलकरांना याचा फायदा होणार असून या निर्णयाचं स्वागत केल आहे.

# पहिली पासून मुलांवर हिंदीची सक्ती योग्य नाही

## सुप्रिया सुळे यांनी शिलाई मशीनचे वाटप कार्यक्रमात मराठीबाबत व्यक्त केले परखड मत

दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** पहिली पासून मुलांवर हिंदीची सक्ती करणे योग्य नाही. असे मत खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केले. त्या नवी मुंबईतील खारघर मध्ये निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने शिलाई मशीनचे वाटप कार्यक्रमात राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. यावेळी सुप्रिया सुळे यांनी मराठी भाषेबाबत आपले परखड मत व्यक्त केले. मराठी ही सर्वांना आलीचं पाहिजे. निलेश लंके यांनी लोकसभेत पहिल्यांदा इंग्रजी भाषेत शपथ घेतली. मला इंग्रजी येते. हम किसीसे कम नहीं हे दाखवून दिले. त्यानंतर मराठी भाषेचाचं वापर केला. माझा कोणत्याही भाषेला विरोधी नाही. मात्र, मराठी आलीचं पाहिजे. मी आणि माझ्या मुलांनी इंग्रजी शाळेत शिक्षण घेतले. मात्र, पहिले प्राधान्य मातृ भाषेला आहे. मावशीवर प्रेम करा. मात्र, आई ती आईचं. घरात आईने मुलांसोबत मराठीतचं संवाद साधावा. तुम्ही मराठीत बोललात तर मुले मराठी बोलतील, तुमच्यावर जबाबदारी आहे. सर्व भाषा आणा, सक्ती करू नका. पहिली पासून मुलांवर कशाला हिंदीची सक्ती योग्य नाही. असे मत खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केले. तसेच त्यांनी सर्व महिलांनी मागणी केली आहे की, नवीन दारूचे दुकाने करू नका. तसेच ट्रकच्या बाबतीमध्ये सरकारने लक्ष घातलं पाहिजे नाही तर नवीन पिढी अडचणीत येईल असे मत व्यक्त केले. नवीन जनसुरक्षा विधेयकाला आमच्या आमदारांचा विरोध झालाय. एका सशक्त लोकशाहीच्या विरोधात जो कायदा असेल त्याच्या विरोधात मी आहे. हनी ट्रॅप हा विषय वारंवार येतोय. यावर मुख्यमंत्र्यांनी स्टेटमेंट केलं पाहिजे.जे काही खरं असेल ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनाचं माहीत असेल. असे मतही त्यांनी व्यक्त




केले. तर, राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्षाबाबत बोलताना त्या म्हणाल्या की, कुठल्याही पक्षामध्ये नवीन तीन वर्षांनी प्रदेशाध्यक्ष होतो आणि ही प्रक्रिया असते. या प्रक्रियेमध्ये बदल होतच राहतात. अशी प्रतिक्रिया खासदार सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## जंगलात सापडला पुरलेला मृतदेह; एका खड्ड्यात मातीखाली मानवाच्या शरीर?

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** राजगड शिवारातील जंगल परिसरात पुरलेल्या अवस्थेत आढळून आलेल्या एका मृतदेहामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. १७ जुलै रोजी ही घटना उघडकीस आली असून, सुरुवातीला डोणगाव पोलिसांनी पाहणी केली. मात्र, घटनास्थळ हे अकोला जिल्ह्यातील चान्नी पोलिस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे पुढील तपास चान्नी पोलिस ठाण्याच्या अधिपत्याखाली पार पडणार आहे.

डोणगावपासून जवळ असलेल्या राजगड शिवारातील उंबरवाडी बिट भागात काही युवक गुरे चारत असताना त्यांना एका खड्ड्यात मातीखाली मानवाच्या शरीराचा काही भाग बाहेर आलेला दिसून आला. पावसामुळे माती खचल्याने हा मृतदेह दिसून आला असावा, असा प्राथमिक अंदाज आहे. ही माहिती ग्रामस्थांनी पोलिस पाटील प्रेमचंद जाधव यांच्याद्वारे ठाणेदार अमरनाथ नागरे यांना दिली. त्यांनी घटनास्थळी भेट दिली. पाहणीअंती या भागाची भौगोलिक मर्यादा अकोला जिल्ह्यात येणारी असल्याने, चान्नी पोलिस ठाण्याशी संपर्क साधून संपूर्ण तपासकार्य त्यांच्याकडे वर्ग करण्यात आले आहे.


## भिवंडीत मनसे व शिवसेना ठाकरे गटाचे टोल नाका बंद आंदोलन




दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी :** मुंबई-नाशिक महामार्गावरील भिवंडी परिसरातील रस्त्यांची दुरवस्था, खड्डे, अपूर्ण सर्विस रस्ते व अंडरपास याविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना (ठाकरे गट) यांनी एकत्रितपणे टोल नाका बंद आंदोलन छेडले आहे. नागरिकांच्या मागण्यांकडे वारंवार दुर्लक्ष होत असल्याने अखेर दोन्ही पक्षांनी रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी एकत्र येत आंदोलनला सुरुवात केली आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून महामार्गावरील खड्ड्यांची तात्काळ दुरुस्ती, अपूर्ण असलेली कामे, रस्त्यांची तातडीने दुरुस्ती, अंडरपास रस्ते, सर्विस रस्ते सुरू करावेत व सर्व रस्ते सुव्यवस्थीत करावेत संबंधित यंत्रणांकडून वारंवार आश्वासने दिली गेली. मात्र, प्रत्यक्षात काहीच होत नसल्यामुळे अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आला. महाराष्ट्र नवनिर्माण सेना व शिवसेना ठाकरे गट यांच्या या आंदोलनामुळे तूर्तास पडघा येथील टोल नाका बंद करण्यात आला असून, ''जोपर्यंत रस्त्यांची दुरुस्ती होत नाही, तोपर्यंत टोल बंदच राहील,'' असा इशारा मनसे व ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. ''दोन्ही भाऊ एकत्र आले आहेत आणि आता आम्ही मागण्या मान्य होईपर्यंत माघार घेणार नाही,'' असे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. या आंदोलनामुळे प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने रस्त्यांची तातडीने दुरुस्ती होणे अत्यावश्यक असल्याचे चित्र उभे राहिले आहे. रस्त्याच्या दुरावस्थेमुळे या ठिकाणी अनेक अपघात होऊन अनेकांचे बळी गेले. मात्र, त्याकडे कोणीही लक्ष देत नाही आणि एखाद्याचा बळी गेल्यानंतर त्या ठिकाणी प्रशासन लक्ष देणार असेल तर प्रशासनाला अजून किती बळी हवेत? असे प्रश्न निर्माण केले आहे. मनसे आणि शिवसेना ठाकरे गट या आंदोलनामध्ये ठाकरे गटाच्या उपनते ज्योती ठाकरे, उपनेते विश्वास थळे, ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष साईनाथ तारे तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष डी. के. म्हात्रे, जिल्हाध्यक्ष शैलेश बिडवी, आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

## मालवण तालुक्यातील तळाशील गावाला बसला समुद्राच्या उधाणाचा फटका



**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी :** सिंधुदुर्गातील मालवण तालुक्यातील तळाशील भागाला समुद्राला आलेल्या उधाणाचा फटका बसला आहे. तळाशील गावातील किनारपट्टीचा १५ ते २० फूट भूभाग समुद्राने गिळंकृत केला आहे. तळाशील गावातील मुख्य रस्ता आणि समुद्र यामध्ये आता फक्त १० ते १५ फूटाचे अंतर राहिले आहे. समुद्रास आणखीन उधाण वाढल्यास हा रस्ताच समुद्र गिळंकृत करण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याबाबत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली होती.

## मोताळा तालुक्याच्या जयपुर गावात अवैध सावकाराच्या घरी छापा; कोरे स्टॅम्प, धनादेश, मोबाईल यासह विविध दस्तऐवज जप्त




दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा लोकनिबंधक सहकारी संस्थेकडे प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार सहायक निबंधक यांच्या पथकाकडून मोताळा तालुक्याच्या जयपुर येथील अवैध सावकार संदीप विनायकराव देशमुख यांच्या घरी छापा टाकण्यात आला, यावेळी घराची झाडाझडती घेतली असता घरातून विविध व्यक्तींनी स्वाक्षरी केलेले कोरे स्टॅम्प पेपर, वेगवेगळ्या व्यक्तींचे आणि बँकेचे कोरे ६१ धनादेश, ५ मोबाईल फोन, नोंदी ठेवल्या जात असल्याच्या वह्या, त्याचबरोबर इतर महत्त्वाचे संशयास्पद दस्तऐवज आढळून आले आहेत. हे संपूर्ण दस्तऐवज पथकाने जप्त केले आहेत. या पथकामध्ये उपनिबंधक विभागातील अधिकारी कर्मचारी, पोलीस कर्मचारी सहभागी होते, या कारवाईमुळे अवैध सावकारांचे धाबे चांगलेच दणाणले असून, जिल्हाभरात एकच खळबळ उडाली आहे, पुढील कारवाई सुरू आहे.

### पृथ्वीला कोणीतरी खुणावतंय; अवकाशात दूरवरून मिळताहेत रहस्यमयी संकेत, ऐकून खरंच वाटणार नाही

नवी दिल्ली : अमेरिकी अंतराळ संशोधन संस्था, नासा कडून आतापर्यंत या क्षेत्रामध्ये वैविध्यपूर्ण कामगिरी करण्यात आली आहे. विविध अवकाश मोहिमा असो किंवा आधुनिक तंत्रज्ञानाच्या बळावर अंतराळात मानवी अस्तित्वं शोधण्यासाठी आणि इतर ग्रहांच्या अभ्यासासाठी सुरू असणारी धडपड असो, जिथं अवकाशाचा विषय निघतो तिथं नासाचाही उल्लेख निर्विवादपणे होतो. अशा या संस्थेनं एक नवा दावा करत संपूर्ण जगाचंच नव्हे, तर ब्रह्मांडाचं लक्ष वेधलं आहे.

# संचालक वाढीचा निर्णय जर गोकुळच्या हिताचा असेल तर विरोधाचं पत्र मागे घेईन : शौमिका महाडिक

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** गोकूळ दूध संघाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत संचालकांची संख्या २१ वरुन २५ करण्याचा ठराव ठेवण्यात आला आहे.मात्र, या ठरावाला विरोध करत याबाबतच पत्र संघाकडे दिले आहे.संचालक वाढीचा निर्णय जर गोकुळच्या हिताचा असेल तर,मी विरोधाचं पत्र मागे घेईन, अशी माहिती शौमिका महाडिक यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, गोकूळ दूध संघाच्या संचालकांची संख्या वाढवण्याचा निर्णय फार महत्त्वाचा आहे.त्यामुळे संचालक मंडळाच्या बैठकीत रुटींगच्या विषयामध्ये याची चर्चा ५ ते १० मिनीटात करून, हा निर्णय घेण्यात येऊ नये.यासाठी वरीष्ठ नेतृत्वासोबत बैठक झाली पाहिजे. त्यांच्याशी चर्चा केली पाहिजे. त्यांचा सल्ला घेतला पाहिजे. मार्गदर्शन घेतलं पाहिजे, अशी आपली भूमिका आहे.गोकूळ दूध संघाच्या संचालक वाढीचा निर्णय महत्त्वाचा असून, येणाऱ्या निवडणुकीत याचा प्रभाव पडणार आहे. त्यामुळे सर्वांनी महायुतीच्या वरीष्ठ नेतृत्वासोबत चर्चा करून करून हा निर्णय व्हावा. संचालक मंडळाच्या बैठकीत ठराव मंजूर करण्यास माझा विरोध आहे. - मात्र गोकुळमध्ये महायुतीत एकमत नसल्याचे तर्क काढले जात आहेत. चार लोकं एकत्र आले की, प्रत्येकाची मतं वेगळी असू शकतात. त्यामुळे आपलं वेगळं मत मांडण म्हणजे लगेच विरोधक झालो, असा त्याचा अर्थ होत नाही.गोकूळ मध्ये सावकर, मुश्रीफ आणि नरके ही सहकारातील मंडळी आहेत. त्यांचा अनुभव माझ्यापेक्षा जास्त आहे.पण त्यांचा अनुभव वेगळा असू शकतो. माझा अनुभव वेगळा असू शकतो. त्यामुळे मी माझं मत व्यक्त केलं. संचालक मंडळाच्या बैठकीत हा विषय ठेवला म्हणजे मंजूर झाला असं नाही.



त्यासाठी पुढे मोठी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत आमची वरीष्ठांसोबत बैठकही होणार आहे. तिथं संचालक वाढीचा निर्णयाची अंमलबजावणी होईल.वरीष्ठांच्या चर्चेअंती जो निर्णय होईल, तो आम्ही सर्व महायुतीचे सदस्य एकमताने मंजूर करु. पण हा निर्णय घेण्यामागे नेमकी नेत्यांची भूमिका काय आहे? याचा गोकूळ दूध संघाला काय फायदा होणार आहे का? हा निर्णय घेतल्यानंतर संघावर काय बोजा पडणार आहे का? गोकुळच्या हिताचा निर्णय आहे का? अशा अनेक प्रश्नांची चर्चा होणं गरजेचं आहे. संचालक वाढीचा निर्णय जर गोकुळच्या हिताचा असेल. भविष्यात गोकुळसाठी उपयोगी पडणारा हा निर्णय असेल तर माझी ही त्याला संमती असेल. आणि विरोधाचं पत्र मी मागे घेईन. अशी माहिती गोकूळ संचालिका शौमिका महाडिक यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती प्रभाग रचनेचा प्रारूप मसुदा प्रसिद्ध

## हरकती २१ जुलैपूर्वी पाठविण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी प्रभागाच्या भौगोलिक सीमा निश्चित करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार निर्वाचक गण रचनेचे प्रारूप प्रसिद्ध करण्यात आले असून तसा आदेश जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांनी निर्गमित केले आहे.

बुलढाणा जिल्हा परिषद निवडणुक विभाग व १३ पंचायत समिती निर्वाचक गणाची प्रारुप प्रभागरचना दि. १४ जुलै २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून संबंधीत तहसिल कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, जिल्हा परिषद पंचायत समिती कार्यालय तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात पहावयास उपलब्ध आहे. मसुद्याबाबत आक्षेप व हरकती असल्यास जिल्हाधिकारी कार्यालय किंवा संबंधित तहसीलदार यांच्याकडे दि.२१ जुलैपूर्वी लेखी सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

बुलढाणा जिल्हा परिषदेची ६१ निवडणुक विभाग निश्चित करण्यात आले असून तालुकानिहाय निवडणूक विभाग प्रारूपानुसार पुढील प्रमाणे. जळगांव जामोद तालुक्यात जामोद, खेर्डा बु., आसलगाव, पिंपळगाव काळे असे ४ निवडणूक विभाग आहेत. संग्रामपूर तालुक्यात सोनाळा, बावणबीर, पळशी झाशी, पातुर्डा बु. असे ४ निवडणूक विभाग.



शेगांव तालुक्यात माटरगांव बु,जलंब असे २ निवडणूक विभाग. नांदूरा तालुक्यात निमगांव, वसाडी बु., चांदूरबिस्वा, वडनेर भोलजी असे ४ निवडणूक विभाग. मलकापूर तालुक्यात नरवेल, मकापूर ग्रामीण,दाताळा असे ३ निवडणूक विभाग. मोताळा तालुक्यात पिंप्रीगवळी, कोथळी, धामणगाव बढे, रोहिणखेड, बोराखेडी असे ५ निवडणूक विभाग. खामगांव तालुक्यात सुटाळा बु., घाटपुरी, अटाळी, अंत्रज, पिंपळगाव राजा, कुंबेफळ, लाखनवाडा बु. असे ७ निवडणूक विभाग. मेहकर तालुक्यात देऊळगांव साकर्शा, डोणगाव, अंजनी बु., जानेफळ, कळंबेश्वर, देऊळगाव माळी, उकळी असे एकूण ७ निवडणूक विभाग. चिखली तालुक्यात उदयनगर, अमडापुर, इसोली, सवणा, केळवद, मेरा खु., मेरा बु. असे एकूण ७ निवडणूक विभाग. बुलढाणा तालुक्यात देऊळगाव, सुंदरखेड, साखळी बु., मासरुळ, धाड, रायपूर असे एकूण ६ निवडणूक विभाग. देऊळगांव राजा तालुक्यात देऊळगांव मही, सिनगांव जहाँगीर, सावखेड भोई असे एकूण ३ निवडणूक विभाग. सिंदखेड राजा तालुक्यात साखरखेर्डा, शेंदुर्जन, किनगाव राजा, दुसरबीड, वर्दडी बु. असे ५ निवडणूक विभाग. लोणार तालुक्यात सुलतानपूर, वेणी, बिबी, पांग्रा डोळे असे ४ निवडणूक विभाग आहे.

## विविध वृत्त...

### चड्डी-बनियन गँग वरुन आमदार संजय गायकवाड संतापले

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** आपल्या विविध वक्तव्याने नेहमीच चर्चेत राहणारे बुलढाण्यातील शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांची पुन्हा जीभ घसरली आहे. काल मंत्रालयात चड्डी बनियन टोळी संदर्भात विरोधकांनी केलेले आंदोलनावर आज त्यांना छेडले असता त्यांनी अनिल परबांवर जोरदार टीका केली ते म्हणाले की, उद्धव ठाकरे जेव्हा लोणार मध्ये आले होते तेव्हा चड्डी बनियान चा आरोप करणारा आदित्य, त्याच आदित्यला मी चड्डी बनियन मध्ये वर घेऊन गेलो होतो. कारण उद्धवला त्याला घेऊन चढता येत नव्हतं, दुसरा आमचा तो अनिल परब चड्डी बनियान वर तो मला नाव ठेवतो, परंतु ज्या दिवशी ते मंत्री होते मी त्यांच्या घरी गेलो होतो ते नाश्ता करीत होते. ते सुद्धा मी जशा अवस्थेमध्ये होतो तसेच होते. किंबहुना त्यांच्या अंगात बनियन पण नव्हतं, आणि आम्ही तरी बनियन मध्ये माणसं दिसतो. तो तर रानडुक्कर दिसत होता. त्याला आम्हाला बोलायचं काय अधिकार आहे. अश्या शब्दात शिवसेनेचे बुलढाण्यातील आमदार संजय गायकवाड यांनी उत्तर दिले. ते आज गुरुवारी शेगावात बोलत होते.

### महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना यांच्या वतीने काम बंद आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना यांच्या वतीने परिचारिका यांच्या विविध मागण्यांसाठी अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयातील आरोग्य परिचारिकांनी एक दिवसीय काम बंद आंदोलन पुकारले आहे. राज्य शासनाने आम्हाला कोविड काळातील भत्ता द्यावा, सातव्या वेतन आयोगातील त्रुटी दूर झाली पाहिजे, आम्हाला गणवेश भत्ता मिळाला पाहिजे, एन जी पी वाय चा थकीत भत्ता अजून पर्यंत शासनाने आम्हाला दिला नाही तो तात्काळ शासनाने आम्हाला द्यावा, यासोबतच कंत्राटी पद्धतीने पदनिर्मिती बंद करून नियमित पद भरती शासनाने तात्काळ करावी, या मागणीसाठी आरोग्य सेविकेने जोरदार घोषणा दिल्या तर आमच्या मागण्या शासनाने तात्काळ मान्य न केल्यास आम्ही अजून आंदोलन तीव्र करू असा इशारा देखील यावेळी परिचारिकांनी दिला आहे.

### धुळ्यात ४ बांगलादेशींना न्यायालयाने ठोठावला तुरुंगवास; बनावट कागदपत्रे रद्द करण्याचे आदेश



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** धुळ्यात बेकायदेशीरपणे वास्तव्य करणाऱ्या चार बांगलादेशी नागरिकांना धुळे न्यायालयाने तुरुंगवासाची शिक्षा सुनावली असल्याची माहिती पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी दिली आहे. काही दिवसांपूर्वी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग आणि एटीएसच्या संयुक्त पथकाने धुळे शहरातील आग्रा रोडवरील एका लॉजमधून चार बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेतले होते. त्यांच्याकडे भारताचे नागरिकत्व सिद्ध करणारे आधार कार्ड आणि पॅन कार्डसारखी बनावट कागदपत्रे आढळून आली होती. तपासात हे चौघे एका एजंटच्या मदतीने रोजगारासाठी बांगलादेशातून भारतात आल्याचे निष्पन्न झाले होते.

या प्रकरणी धुळे स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. न्यायालयाने या चौघांना दोषी ठरवत विविध कलमांनुसार ३ महिने साधी कारावास आणि ६ महिने सक्तमजुरीची शिक्षा, तसेच दंड ठोठावला आहे. त्याचबरोबर त्यांची बनावट कागदपत्रे रद्द करण्याचे महत्त्वपूर्ण आदेशही धुळे जिल्हा सत्र न्यायालयाने दिले आहेत. बनावट कागदपत्रांच्या आधारे वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशींना शिक्षा होण्याची उत्तर महाराष्ट्रातील ही पहिलीच मोठी कारवाई मानली जात आहे.

## चैन स्नॅचिंग करणाऱ्या रेकॉर्डवरील गुन्हेगाराला अटक; गुन्हे शाखेचे मोठे यश



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** शहरातील महिलांवर लक्ष ठेवून पाठलाग करत चैन स्नॅचिंग करणाऱ्या एका रेकॉर्डवरील गुन्हेगाराला गुन्हे शाखा पोलिसांनी अटक केली असून, या आरोपीने तपासादरम्यान आणखी पाच चोरीचे गुन्हे कबूल केले आहेत. पोलिसांनी दोन आरोपींना अटक करत लाखो रुपयांचा चोरीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. आरोपीचे नाव कन्हैया बोरसे असून, तो यापूर्वी बँकेतील वसुली एजंट म्हणून काम करत होता. मात्र त्याने ही नोकरी सोडून सोनसाखळी चोरीच्या मार्गाने गुन्हेगारीकडे वळण्याचा मार्ग स्वीकारला. कन्हैया वेगवेगळ्या भागांत जाऊन एकट्या महिलांना लक्षात घेऊन त्यांच्या मागे लागायचा आणि संधी मिळताच सोनसाखळी हिसकावून पलायन करायचा. नागपूर शहरातील विविध पोलीस स्टेशनच्या हद्दीत अशी अनेक प्रकरणं घडत होती. गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपीचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतलं. चौकशीत त्याने पाच चैन स्नॅचिंगच्या गुन्ह्यांची कबुली दिली. पोलिसांनी या प्रकरणात दुसऱ्या एका साथीदारालाही अटक केली आहे.

कन्हैया बोरसे हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून, पोलीस त्याचा मागील काही दिवसांपासून शोध घेत होते. अखेर गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला अटक करत मोठे यश मिळवले आहे.

## विविध मागण्यांसाठी शासकीय नर्सिंग शिक्षकांचे काम बंद आंदोलन




**बुलडाणा/प्रतिनिधी :** शासकीय नर्सिंग शिक्षकांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी १५ जुलैपासून आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. त्या अनुषंगाने आज संपूर्ण कर्मचाऱ्यांकडून काम बंद ठेवण्यात आल आहे. तर मागण्या मंजूर न झाल्यास १८ जुलैपासून बेमुदत काम बंद करण्याचा इशारा नर्सिंगच्या शिक्षकांनी दिला आहे. त्यांच्या मागण्यांसाठी बक्षी समिती व राज्य वेतन त्रुटी निवारणासाठी खुल्लर समिती नेमण्यात आली, मात्र अजूनही त्यांच्या वेतन त्रुटीचा प्रश्न मार्गी लागला नाही. डिप्लोमा धारकांपेक्षा डिग्रीधारकांवर एक प्रकारे हा अन्याय होत असल्याच्या भावना या शिक्षकांनी व्यक्त केल्या आहेत. बुलढाणा शासकीय नर्सिंग कॉलेजमधील १० शिक्षिका संपावर गेल्या आहेत, दहा दिवसांवर नर्सिंगच्या विद्यार्थ्यांची परीक्षा आली आहे, त्यामुळे कॉलेजमधील शंभर पेक्षा अधिक नरसिंगच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता आहे.

### तुम्हीही मुलांना डे-केअरमध्ये सोडताय? गोरेगावमध्ये घडली भयंकर घटना, सात वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार

**मुंबई/प्रतिनिधी :** तुम्हीदेखील तुमच्या बाळाला पाळणाघरात ठेवताय? तर गोरेगावमध्ये घडलेली एक घटना तुम्हाला माहिती असायलाच हवी. सात वर्षांच्या चिमुरडीवर पाळणाघर चालवणाऱ्या व्यक्तीने लैंगिक आत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. ४४ वर्षीय नराधमाला दिंडोशी पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीने व्हिडिओ गेम दाखवण्याच्या बहाण्याने चिमुरडीला बेडरुममध्ये नेत तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे तपासात उघड झाले आहे. चिमुरडीने पाळणाघरात जायला नकार दिल्याने पालकांना संशय आला. तेव्हा त्यांनी चिमुरडीला याबाबत विचारणा केली. तेव्हा तिने घडलेल्या प्रकाराचा उलगडा पालकांसमोर केला. तेव्हा पालकांना धक्काच बसला.

## शेतकऱ्यांच्या शेतात हुमणी अळीचा कहर; चिखली तालुक्यातील बारा गावे हुमणी अळीने संकटात





**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील खरीप हंगामातील पिके बहरलेली असताना बुलढाणा जिल्ह्यातील सोयाबीन पिकांत आता हुमणी अळीने शिरकाव केला असून शेतकरी संकटात सापडला आहे. एकट्या चिखली तालुक्यातील बारा गावांमध्ये हुमणी अळीचा जोरदार प्रकोप दिसून येत आहे. विशेषतः सोयाबीन पीक या कीडमुळे बाधित झाले असून, नुकतीच अंकुरलेली पिके वाळू लागली आहेत. परिणामी शेतकऱ्यांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली असून, उत्पादनात घट होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. तर हुमणी अळीने झालेले नुकसान नैसर्गिक आपत्तीत येत नसल्याने त्याला नुकसान भरपाई सुद्धा मिळत नाही, अळीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केलीय. तर आता सोयाबीन पिक वाळत असल्याने दुबार पेरणीचे संकट ही उभे राहिले.

## कृषी केंद्र चालकांकडून जादा दराने युरिया विक्री; मनसे पदाधिकाऱ्यांनी आरोप करत जिल्हा कृषी अधिकाऱ्यांची घेतली भेट



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील पिकांना आता फवारणी आणि रासायनिक खतांची गरज भासू लागल्याने शेतकऱ्यांकडून रासायनिक खते, कीटकनाशके, तणनाशके खरेदीसाठी कृषी केंद्रांवर गर्दी केली जात आहे. अशातच काही ठिकाणी युरिया खताचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून शेतकऱ्यांना एका बॅग वर शंभर ते दीडशे रुपये जादा दराने खतांची विक्री केली जात असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. या संदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जिल्हा कृषी अधिकाऱ्यांची भेट घेत संबंधित कृषी केंद्र संचालकावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## वसंतराव नाईक महामंडळ; स्वयंरोजगाराच्या कर्ज योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** वसंतराव नाईक विमुक्त जाती आणि भटक्या जमाती विकास महामंडळातर्फे स्वयंरोजगारासाठी कर्ज योजना राबविण्यात येते. यासाठी इच्छुकांनी अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, तसेच पैलवान कै. मारुती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळ व राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ या दोन उपकंपनीमार्फत वडार व रामोशी समाजातील नागरिकांसाठी स्वयंरोजगाराच्या माध्यमातून कृषी संलग्न व्यवसाय, लघू उद्योग, वाहतूक क्षेत्रातील संबंधित व्यवसाय, तांत्रिक व्यवसाय, पारंपारीक व्यवसाय अथवा सेवा उद्योग सुरु करण्यासाठी राष्ट्रीयकृत बँक आणि महामंडळामाध्यमातून वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना आणि गट कर्ज व्याज परतावा योजना सुरु आहे.

वैयक्तिक कर्ज योजनेअंतर्गत जास्तीत जास्त १५ लाख रुपये तर गट कर्ज योजनेअंतर्गत ५० लाख रुपये पर्यंत कर्जाचा लाभ घेता येतो. लाभार्थ्यांने बँकेत मुद्दल आणि व्याज भरणे आवश्यक असून, त्यानंतर महामंडळ १२ टक्के



व्याज रकमेपर्यंतची रक्कम थेट लाभार्थ्याच्या खात्यात परतफेड करते. यासाठी www.vjnt.in या संकेतस्थळावरून ऑनलाईन प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

याशिवाय बीज भांडवल कर्ज योजनेअंतर्गत ५ लाख पर्यंतचे कर्ज, तर थेट कर्ज योजनेअंतर्गत १ लाखांचे बिनव्याजी कर्ज महामंडळाच्या कार्यालयात थेट अर्ज करून मिळू शकते. जास्तीत जास्त इच्छुक व्यक्ती व संस्थांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या.), बुलढाणा यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी वसंतराव नाईक विमुक्त जाती आणि भटक्या जमाती विकास महामंडळ(मर्या), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बुलढाणा येथे किंवा दुरध्वनी क्रमांक ०७२६२-२९५३१९ या क्रमांकावर संपर्क साधावा.